# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०३/०४/२०२४

# प्रेसनोट

मा. सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी, २४ कल्याण लोकसभा मतदार संघ, यांचे निर्देशानुसार दिनांक ०१ एप्रिल, २०२४ रोजी, उल्हासनगर शहरातील सर्व दिव्यांग संघटना व स्वीप कक्षाचे नोडल अधिकारी यांचे समवेत बैठक पार पडली. या बैठकीस श्री. विशाल कदम, निवडणुक विभाग प्रमुख, उल्हासनगर महानगरपालिका, श्री. राजेश घनघाव, नोडल अधिकारी $85^+$ व दिव्यांग व्यवस्थापन समिती कक्ष आणि श्री. नितीन गावंडे, स्वीप नोडल अधिकारी, श्री पंडीत माळी, श्री. प्रविण दिंडोर्डे, दिव्यांग व्यवस्थापन समिती, सहाय्यक अधिकारी व दिव्यांग संघटनांचे पदाधिकारी श्री. सचिन सावंत, श्री. राजेश साळवे, श्री. टीकम उदासी, श्री. हिरो रजाई, श्रीम. रेहाना कुरेशी, श्रीम. छाया सावंत व इतर सदस्य हे उपस्थित होते.

सदर प्रसंगी येत्या लोकसभा निवडणुकीमध्ये दिव्यांग व्यक्तींचा सहभाग वाढविण्यासाठी मा. निवडणुक आयोगाने दिलेल्या सुविधा व Voter Helpline App बाबत चर्चा केली आणि सर्व दिव्यांग बंधू व भगिनींना मतदान करणेबाबत श्री. विशाल कदम, निवडणुक विभाग प्रमुख, उल्हासनगर महानगरपालिका आणि नितीन गावंडे, स्वीप नोडल अधिकारी यांनी आवाहन केले.

श्री. राजेश घनघाव, नोडल अधिकारी $85^+$ व दिव्यांग व्यवस्थापन समिती कक्ष यांनी सदरील कार्यक्रमाचे उद्देश कथन करून सुरवात केली आणि सूत्र संचालन केले.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
   - सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.